Exh.No. 60

**नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब ज्यु. डी.**
यांचे कोर्टात..

**रे. मु. नं. 854/2018**

**वादी**
सौ. आशा उध्दव आव्हाड
**प्रतिवादी**
प्रविण दत्तात्रय लोहकरे, वगैरे

**याकामी प्रतिवादी कडुन सरतपासणीचे ॲफिडेव्हिट..**

**याकामी मी प्रविण दत्तात्रय लोहकरे, वय 32, धंदा शेती, रा. गणेशवाडी, ता. नेवासा, जि. अ. नगर सत्य प्रतिज्ञेवर सरतपासणीचे ॲफिडेव्हिट स्वत: करीता व प्रतिवादी नं.2 करीता करतो की,**

Order
Read & Recoreded.

PRANITA RITESH SUGAONKAR Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR Date: 2026.01.12 05:54:18 +0530
Jt.CJJD

1) वादीचा दावा व मनाई अर्ज खरा योग्य व कायदेशिर नाही, त्यातील संपूर्ण मजकूर आम्ही स्पष्टपणे नाकारीत आहेत.

2) वादीचे दावा कलम 1 मध्ये दिलेले मिळकत वर्णन चुकीचे असुन मोघम आहे, ते या प्रतिवादींना मान्य नाही, कबुल नाही. सबब दावा व मनाई अर्ज रद्द करण्यांत यावा.

3) वादीने सदर दाव्यात खरी वस्तुस्थिती लपवुन ठेवुन खोटया मजकूराच्या आधारे दावा केलेला असल्याने वादीचा दावा व मनाई अर्ज रद्द करण्यांत यावा.

4) वादीच्या दावा मिळकतीच्या मालकी हक्काबाबत आम्ही हरकत घेतलेली असल्याने तसेच मालकी हक्क नाकारीत असल्याने कायदयाने आमच्या विरुध्द केवळ मनाईचा दावा चालु शकत नाही तो रद्द होण्यास पात्र आहे.

5) दावा मिळकत ही गट नंबर 308 या मिळकतीचा भाग आहे. या मध्ये माझे नावावर 37 आर क्षेत्र आहे. मुळ गट नंबर 308 ही मिळकत आमची तसेच माझे चुलते मधुकर भास्कर लोहकरे यांची वडिलोपार्जित एकत्र वहिवाटीची होती व आहे. या मिळकतीचे अदयाप पावेतो सरस निरस मानाने प्रत्यक्ष वाटप झालेले नव्हते व नाही. माझे चुलते मधुकर भास्कर हे सुरुवातीपासुन बाहेरगावी नोकरीस असल्याने त्यांनी कधी दावा मिळकतीत येऊन प्रत्यक्ष जमिनीमध्ये कब्जा वहिवाट केलेली नव्हती व नाही. मुळ गट नंबर 308 या मिळकतीचे वर नमुद केल्या प्रमाणे सरस निरस मानाने वाटप न झालेले असल्याने या मिळकतीमध्ये माझे वडिल मयत दत्तात्रय भास्कर लोहकरे तसेच मधुकर भास्कर लोहकरे यांचा व या दोघांच्या तीन विवाहीत बहिणी नामे सुमन ज्ञानदेव चौधरी, निर्मला यशवंत येसेकर, जयश्री अशोक झुगे यांचा हिंदु कायदया प्रमाणे अविभक्त हिस्सा होता व आहे. अदयाप

12/1/26
सहा.अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर
नेवासा

पावेतो मुळ गट नं. 308 चे वाटप झालेले नसल्याने या सर्वांची एकत्रीत सामाईकांत कब्जा वहिवाट होती व आहे. परंतु सर्वांसाठी या मिळकतीवर माझे वडिल हे प्रत्यक्ष मेहनत मशागत करुन उत्पन्न उपभोग घेत होते. त्यामुळे वादीस दावा मिळकत विकणारे मधुकर भास्कर लोहकरे यांनी कधीही दावा मिळकतीमध्ये येवुन प्रत्यक्ष कब्जे वहिवाट केलेली नव्हती व नाही. सदरचा जबाब मी स्वत: करीता व प्रतिवादी नं.2 ही माझी आई असल्याने तिच्याकरीता देत आहे.

6) वर नमुद केल्या प्रमाणे मधुकर भास्कर व सुमन मधुकर लोहकरे यांचा दावा मिळकतीवर स्वतंत्र असा कधीही प्रत्यक्ष कब्जा नव्हता व नाही. तसेच फक्त त्यांची नावे कागदोपत्री नोंदल्या गेल्यामुळे त्याचा गैरफायदा घेवुन मुळ गट नं. 308 मधील हिस्यामधील हिस्सेदारांच्या कोणत्याही दिशा वाटपाने ठरलेल्या नव्हत्या व नाही असे असतांनाही मधुकर भास्कर लोहकरे व सुमन मधुकर लोहकरे यांनी केवळ त्यांची नावे रेकॉर्ड ऑफ राईटला आहे याचा गैरफायदा घेवुन बिन कब्जाचे खरेदीखत वादीस रक्कम रु. 8,85,000/- चे दि.14.06.2017 रोजी करुन दिलेले आहे. या खरेदीखताने वादीस दावा मिळकतीचा प्रत्यक्ष कायदेशिर कब्जा कधीही मिळु शकत नव्हता व नाही व मिळालेला नाही त्यामुळे वादीचा दावा मिळकतीवर प्रत्यक्ष कब्जे वहिवाट असण्याचे कारण नाही. तसेच वादीचा दावा मिळकतीमध्ये प्रत्यक्ष कब्जे वहिवाट नसल्याने तीस आम्ही सोयाबिन पिक काढण्यासाठी हरकत अडथळे करण्याचा प्रश्नच उदभवत नव्हता व नाही. मी दाव्यात नमुद केलेले दावा मिळकतीमधील सोयाबिनचे पिक हे आम्ही सामाईकांत आमच्या कुटुंबासाठी सदरचे पिक केलेले होते या पिकाशी वादीचा कुठलाही अर्थाअर्थी सबंध नव्हता व नाही त्यामुळे वादीने दावा मिळकतीमध्ये येणे व त्यांना आम्ही हरकत अडथळे करणे हे वादीने खोटे नमुद केले आहे.

7) मी दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवुन आमचे हिस्याचा प्रत्यक्ष कब्जा मिळण्याचा दावा रे. मु. नं. 425/2018 चा या मे. कोर्टात केलेला असुन त्याचे कामकाज चालु आहे.

8) वादीचा दावा मिळकतीवर कधीही कब्जा नव्हता व नाही. वादीस प्रायमाफेशी केस नाही. त्यामुळे वादीला मनाई हुकूमा सारखा हुकूम नाकारल्यास वादीचे कोणतेही काही एक नुकसान होणार नाही. याउलट आमच्या विरोधात वादीचे बाजुने मनाई हुकूम दिल्यास आमच्यावर फार मोठा अन्याय होणार आहे. म्हणुन वादीचा दावा व मनाई अर्ज रद्द करण्यांत यावा.

9) वादीने सदरच्या मुळ दाव्यामध्ये आमच्या विरुध्द केलेल्या तक्रारी संपुर्ण पणे खोटे आहे. आम्ही वादीस कधीही दमदाटी करुन जिवे मारण्याची धमकी दिलेली नाही. तसेच कधीही वादी दावा मिळकतीत आलेली नाही व येण्याचे काही एक कारण नाही. वादीस सदरचा दावा दाखल करण्यास काही एक कारण प्रत्यक्ष घडलेले नाही. त्यामुळे सदरचा दावा रद्द करण्यास पात्र आहे, तो रद्द करण्यात यावा.

10) मी सदरच्या दाव्यामध्ये दाखल केलेली कैफियत व त्यामधील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. त्याच प्रमाणे सदरच्या दाव्यामध्ये दाखल केलेली सर्व कागदपत्रे त्यातील माहिती खरी व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन ते पुराव्याकामी वाचण्यात यावे तसेच आणखी सदर मिळकती संदर्भात महत्वाचे कागदपत्रे उपलब्ध झाल्यास सदर दाव्यामध्ये दाखल करण्याची परवानगी असावी ही विनंती.

11) वरील सर्व कारणांचा विचार होऊन वादीचा दावा खर्चासह रद्द करण्यात यावा.

12) इतर योग्य ते न्यायाचे हुकुम माझ्या बाजुने करण्यात यावे.

येणे प्रमाणे सरतपासणीचे ॲफिडेव्हिट केले असे.

नेवासा
दि.12/01/2026

ॲफिडेव्हिट करणार

याकामी मी प्रविण दत्तात्रय लोहकरे, वय 32, धंदा शेती, रा. गणेशवाडी, ता. नेवासा, जि. अ. नगर सत्य प्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वर लिहिलेला संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन त्याचे सत्यतेसाठी या लेखाखाली मी माझी सही आज रोजी नेवासा येथे केली आहे.

नेवासा
दि.12/01/2026

ॲफिडेव्हिट करणार

**ओळख..**
**( ॲड. बी. जे. चव्हाण)**

Aadhar ID 7489 7927 4529

Solemnly affirmed before me
by Pravin Dattatraya Lokkare Age 32 R/o Ganeshwadi Tal Newasa
who is identified before me
by Adv. B. J. Chavan
whom I personally know

12/1/26

Asstt Superintendent